नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २५/०७/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

## पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामिण अंतर्गत चारीत्र्य प्रमाणपत्र आता झाले डीजिटल

**(महत्वाचे)**

पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामिण अंतर्गत नागपुर जिल्हयातील ग्रामिण भागातील लोकांना चारीत्र्य प्रमाणपत्र पडताळणी करीता पोलीस अधीक्षक कार्यालय नागपुर ग्रामिण येथे पायपीट करावी लागत होती परंतु या बाबीची दखल घेवुन मा. श्री विजय कुमार मगर, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामिण यांचे मार्गदर्शनात श्री. अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक, पोलीस नाईक चेतन राउत, प्रभाकर बले, पोलीस शिपाई सत्येंद्र लोखंडे जिल्हा विशेष शाखा यांचे अथक प्रयत्नाने नागपूर ग्रामीण जिल्हयातील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सेवा ही दि. १५/०७/२०२२ पासुन ऑनलाईन पध्दतीने डिजीटल चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हयातील सुदुर ग्रामीण भागातील जनतेला होणारा आर्थीक, शारीरीक तसेच मानसीक त्रासापासुन मुक्तता मिळाली आहे. यापुढे जिल्हयातील जनतेला चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्रा करीता पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागणार नाही.

पोलीस चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र हे ऑनलाईन पध्दतीने सुरू झाल्याने अर्जदार यांना त्यांचे चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र हे जवळच्या सायबर कॅफे वरून किंवा मोबाईलच्या मदतीने काढता येईल याची सर्व चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र अर्जदारांनी नोंद घ्यावी. असे आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर